साप्ताहिक

# परळी परिसर

Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25

* परळी वैजनाथ * सोमवार, दि. १७ नोव्हेंबर २०२५ * पाने-४ * २/-₹ www.parliparisar.com

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...


न्यू सुधांशू प्रिंटर्स

श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, Mob.9881244075

कापडी पिशव्या छापून मिळतील.

# महाविकास आघाडीतील राष्ट्रवादीने काँग्रेसच्या बहादूरभाईंना दिला धोका, केला विश्वासघात!

## परळी पालिका निवडणुकीत काँग्रेसला सहानुभूती मिळणार?



**परळी वैजनाथ, (लक्ष्मण वाकडे):- परळी पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीतील घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) ने महाविकास आघाडीचे प्रमुख नेते व काँग्रेसचे परळी शहराध्यक्ष बहादूरभाई यांना धोका देत त्यांचा मोठा विश्वासघात केला आहे. यामुळे निवडणुकीत महाविकास आघाडीत बिघाडी झाली आहे. या बिघाडीचा फायदा महायुतीला होणार असला तरी बहादूरभाई यांच्या बाजूने सर्वसामान्यांत सहानुभूती मोठ्या प्रमाणात वाढली आहे.**

गेल्या अनेक वर्षापासून स्थानिक विकास प्रश्न, परळी शहरातील नागरी समस्या व इतर प्रश्न तसेच परळी पालिकेत सत्ताधाऱ्यांचा विकासकामातील भ्रष्टाचार, अधिकाऱ्यांची मनमानी या विरूद्ध सतत आवाज उठवून, रस्त्यावर उतरून संघर्ष करणारे काँग्रेसचे परळी शहराध्यक्ष बहादूरभाई यांनी महाविकास आघाडीची मोठी ताकद येथे निर्माण केली. या आघाडीचे प्रमुख नेते म्हणून गेल्या लोकसभा व विधानसभेच्या निवडणुकीत त्यांनी सत्ताधाऱ्यांच्या विरोधात मोठा संघर्ष करत परळीची खिंड लढवली होती. याचा फायदा या निवडणुकीत महाविकास आघाडीला झाला. स्वतः मोठी आर्थिक झळ सोसून श्री बहादूरभाई येथे लढत आहेत. परळी पालिकेच्या निवडणुकीची मोठी तयारी ते गेल्या अनेक महिन्यांपासून करत आहेत. मोठ्या ताकदीनिशी ही निवडणूक लढवण्याचा व परळी पालिकेवर महाविकास आघाडीचा झेंडा फडकवण्याचा निर्धार व तयारी करणाऱ्या बहादूरभाई यांना विश्वासात न घेता आघाडीतील घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) ने इतर पक्षातून आलेल्या नेत्याला नगराध्यक्षपदाची उमेदवारी दिल्याने आघाडीत बिघाडी झाली आहे. यामुळे आघाडीत येथे उघडपणे दोन गट पडले आहेत. शिवसेना (उबाठा) यांच्यातही नाराजी दिसते आहे. याचा फायदा या निवडणुकीत महायुतीला येथे होणार आहे. असे असले तरी राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरद पवार गट) स्थानिक नेत्यांनी धोका दिल्याने प्रामाणिकपणे लढणारे काँग्रेसचे बहादूरभाई यांच्या बाजूने सर्वसामान्य नागरिकांत सहानुभूती वाढली आहे. यामुळे काँग्रेसला या सहानुभूतीचा मोठा फायदा होईल असे दिसते आहे.मोठ्या ताकतीसह काँग्रेस परळी पालिकेच्या निवडणुकीत उतरल्याने इतरांची दमछाक होणार आहे. धोका व विश्वासघात झाल्याने या निवडणुकीत बहादूरभाई यांनी महाविकास आघाडीकडून आपल्या पत्नीची उमेदवारी सर्वात अगोदर जाहीर करून खळबळ उडऊन दिली आहे. इतर पक्षातील दुखावलेले अनेक नेते व कार्यकर्ते काँग्रेसच्या संपर्कात येत असल्याने याचा फायदा येथे काँग्रेस आघाडीला होणार असल्याचे दिसते. योग्य व निष्ठावान तसेच तोडीस तोड कार्यकर्त्यांना काँग्रेस आघाडीची उमेदवारी देण्यावर बहादूरभाईंचा भर दिसतो आहे. दरम्यान, या निवडणुकीत बहादूरभाई यांना एकटे पाडल्यामुळे काँग्रेसच्या जिल्ह्यासह राज्यातील नेतृत्वाने परळीत बहादूरभाई यांच्या पाठीशी मोठी ताकद लावली आहे. याचा फायदा या निवडणुकीत काँग्रेसला होणार असल्याचे सध्या चित्र आहे. ***

## परळी शहर व परिसर थंडीने गारठला

परळी वैजनाथ, (बातमीदार):- परळी शहर व परिसरात गेल्या चार-पाच दिवसांपासून कडाक्याची थंडी पडली आहे. रविवार (ता.१६) पासून त्यात वाढ झाल्याने परळी शहर व परिसर चांगलाच गारठला आहे.

मराठवाड्यात रविवार, सोमवार, मंगळवार असे तीन दिवस थंडीचा येलो अलर्ट दिला आहे. हवामानाच्या या अंदाजाप्रमाणे रविवार पासून थंडीत वाढ झाली आहे. थंडीमुळे शहरासह ग्रामीण भागात अनेक ठिकाणी शेकोट्या पेटवल्या जात आहेत. मफलर, स्वैटर सारखे उबदार कपडे आबालवद्ध घालून थंडीपासून बचाव करत आहेत. पुढील काही दिवस अशीच थंडी कायम रहाणार आहे.

दरम्यान, ही थंडी रब्बीच्या गहू व इतर पिकांसाठी अनुकूल आहे, असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. ***

## रविवारपर्यंत नगराध्यक्षपदासाठी ९ तर नगरसेवकपदासाठी १५७ अर्ज दाखल

परळी वैजनाथ, (बातमीदार):- येथील नगर पालिकेच्या नगराध्यक्ष व नगरसेवक पदाच्या निवडणुकीसाठी रविवारी (दि.१६) १५७ नामनिर्देशनपत्र दाखल झाले आहेत. त्यात नगराध्यक्ष ९ व नगरसेवकपदासाठी १४८ अर्ज आले आहेत.

सोमवारी (दि.१७) उमेदवारी भरण्याची शेवटची तारीख आहे. त्यामुळे सोमवारी पालिका कार्यालयात उमेदवारी अर्ज भरण्यासाठी इच्छुकांची गर्दी उसळणार आहे. ***

**सा.परळी परिसर चे वार्षिक वर्गणीदार व्हा!**

-० अंकासाठी संपर्क ०-

मो.९४२२३२८४९३

## परळी नगर परिषद निवडणुकीसाठी कर्मचाऱ्यांना देण्यात आले प्रशिक्षण

परळी वैजनाथ (बातमीदार):- परळी नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीची प्रक्रिया सुरू झाली असून, राज्य निवडणूक आयोगाने ४ नोव्हेंबर २०२५ रोजी कार्यक्रम जाहीर केल्यानंतर आचारसंहिता लागू झाली. नगर परिषद निवडणूकसाठी ७९,५६९ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत, त्यात ४१,०२३ पुरुष, ३८,५४३ महिला आणि ३ इतर मतदार आहेत. मतदानासाठी ८८ केंद्रे निश्चित केली आहेत. मतदान केंद्राकरिता नियुक्त मतदान केंद्राध्यक्ष व ईतर मतदान अधिकारी यांचे मतदान प्रक्रियाबाबतचे प्रशिक्षण रविवारी (दि.१६) लोकनेते गोपीनाथराव मुंडे नटराज रंग मंदिर येथे यशस्वीपणे संपन्न झाले. दरम्यान निवडणूक आयोगाच्या सर्व मार्गदर्शक तत्वांचे ततोतंत पालन करुन लोकांचा लोकशाही मुल्यांवरील, निवडणूक प्रक्रीयेवरील विश्वास वृध्दींगत करावा, पारदर्शी व भयमुक्त वातावरणात निवडणूक पार पाडण्यासाठी सर्वांनी दक्ष राहून समन्वयाने काम करावे असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी अरविंद लाटकर यांनी केले आवश्यक सूचनाही दिल्या. तसेच तहसील कार्यालयाचे नायब तहसीलदार पंडित सुरवसे, नायब तहसीलदार महेश वाकडे, नगर परिषद उपमुख्याधिकारी संतोष रोडे यांसह अन्य अधिकारी यावेळी उपस्थित होते. सदर प्रशिक्षण यशस्वी करण्यासाठी तहसीलचे ज्ञानोबा मुसळे व इतर अधिकारी कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. ***

## रामनगर मतदार यादीत गोंधळ; निवडणूक अधिकाऱ्यांकडे तक्रार

परळी वैजनाथ (बातमीदार):- परळी नगरपरिषद निवडणुकीच्या तोंडावर रामनगर परिसरातील मतदारयादीत मोठ्या प्रमाणात झालेल्या गोंधळामुळे स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. अनेक वर्षांपासून नियमित मतदान करणाऱ्या मतदारांची नावे अचानक वगळली जाणे, तर काहींची नावे चुकीच्या प्रभागात नोंदवली जाणे, असा गंभीर आरोप नागरिकांनी केला आहे. या संदर्भात निवडणूक निर्णय अधिकारी, नगरपरिषद परळी यांना नागरिकांच्या वतीने लेखी निवेदन सादर करण्यात आले आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, गेल्या २०-२५ वर्षांपासून सातत्याने मतदान करणाऱ्या असंख्य नागरिकांची नावे या निवडणुकीत वगळण्यात आली आहेत. काही मतदारांची नावे त्यांच्या मूळ प्रभागापेक्षा भिन्न प्रभागात टाकण्यात आल्यामुळे मतदानाचा मूलभूत अधिकार धोक्यात आला आहे, अशी तक्रार करण्यात आली आहे.

तसेच, भारतीय नागरिकांच्या संविधानिक मतदानाधिकाराशी छेडछाड होत असून यामागील राजकीय हेतूंची चौकशी करण्यात यावी, अशीही मागणी निवेदनात स्पष्टपणे व्यक्त केली आहे.**

### परळी नगरपालिका अध्यक्षपदाचा पहिला उमेदवार काँग्रेसचा घोषीत

# समविचारी पक्षांना सोबत घेवून प्रभागातील उमेदवार घोषीत करणार - बहादूरभाई





परळी (बातमीदार):- परळी नगरपालिका निवडणुकीत भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस मधील बडे नेते उमेदवारी घोषीत करण्यासाठी पुढे येत नसताना काँग्रेसने शनिवार दि.१५ रोजी पत्रकार परिषद घेवुन नगराध्यक्ष पदासाठी मैमुना बेगम सय्यद हनिफ उर्फ बहादूरभाई यांच्यख उमेदवारीची घोषणा करत निवडणुकीचे रणशिंग फुंकले. प्रभागातील सदस्यांच्या उमेदवारी अंतिम टप्प्यात असून लवकरच महाविकास आघाडीतील घटक पक्षांसह सर्व उमेदवारांच्या घोषणा करणार असल्याचे काँग्रेसचे शहराध्यक्ष सय्यद हनिफ उर्फ बहादूरभाई यांनी सांगितले.

परळी शहरात शनिवारी सायंकाळी प्रदेश उपाध्यक्ष अनिल मुंडे, तालुकाध्यक्ष प्रकाश मुंडे,शहर सरचिटणीस शशिशेखर चौधरी आपचे जिल्हा उपाध्यक्ष विजय जोशी,प्रकाश देशमुख यांची पत्रकार परिषद झाली.यावेळी बोलाताना बहादुरभाई यांनी सांगितले की.आम्ही महाविकास आघाडीतील घटकपक्ष म्हणुन लोकसभा निवडणुकीत बजरंग सोणवणे यांच्या प्रचाराची धुरा अग्रक्रमाने सांभाळत शहरातील ३० पैकी २८ बुथवर मताधिक्य दिले होते.विधासभा निवडणुकीत आमचा उमेदवार आयात करत तुतारी चिन्ह दिले तरी आम्ही प्रचाराची धुरा सांभाळली.परळी नगरपालिकेच्या अध्यक्षपदावर काँग्रेसचा हक्क असल्याने महाविकास आघाडी म्हणुन शिवसेना ठाकरे गट, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट,माकप अशा पक्षांच्या स्थानिक पदाधिकार्यांची दि.२६ ऑक्टोबर रोजी बैठक घेतली.यानंतर आम्ही पुढाकार घेत आमच्यापेक्षा अधिक सक्षम उमेदवार असेल तर त्यावर विचार करु असेही ठरले.परंतु राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थानिक नेत्यांची वेगळी चुल मांडण्याची तयारी सुरु झाली आणि त्यांनी आपल्या पक्षातील पदाधिकार्यास अध्यक्षपदासाठी पुढे करण्याऐवजी ज्या व्यक्तीने २०११ साली नगराध्यक्षपद भुषवुन परळीचे वातावरण गढुळ करणार्या व्यक्तीच्या खांद्याला खांदा लावुन काम केले.काही महिन्यापर्यंत त्या नेत्याचा उदोउदो करत आले आणि अचानकपणे शहरात अपक्ष उमेदवारी जाहिर करुन प्रचाराच्या कामाला लागलेल्या व्यक्तीचे कपडे बदलुन महाविकास आघाडीत आणल्यानंतर त्यास आम्ही कडाडून विरोध केला.परळी शहरातील जनता भ्रष्टाचार, गुंडागर्दी याला कंटाळलेली असुन शहराच्या विकासासाठी आम्ही काँग्रेसच्या वतीने महाविकास आघाडीकडुन उमेदवार देत पुर्ण ताकदीने निवडणूक लढवणार असल्याचे सय्यद हनिफ यांनी सांगितले. ***

## ३१ वेठबिगारांची जिल्हाधिकारी व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण जनसाहस यांच्या संयुक्त विद्यमाने सोडवणूक

बीड (जिमाका):- जिल्हातील माजलगाव तालुक्यात जबरदस्तीने वेठीबिगारीला जुम्पल्या गेलेल्या ३१ जणांची सुटका जिल्हाधिकारी बीड, तसेच जिल्हा निधी सेवा प्राधिकरण आणि जनसाहस यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आली

माजलगाव तालुक्यात केली कार्यवाही सर्व नागरिक या आदिवासी समाजाचे असून त्यांच्याकडून गत तीन महिन्यापासून बळजबरीने काम करून घेतल्या जात होते मारहाण व धमकी होत होती अशी तक्रार त्यांच्या नातेवाईकांनी केल्यानंतर न्या आनंद यावलकर प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश बीड विवेक जॉन्सन जिल्हाधिकारी बीड व न्या. वाहब सय्यद सचिव जिल्हा विधिसेवा प्राधिकरण बीड यांच्या मार्गदर्शनाखाली ३१ कामगारांची सुटका करण्यात आली. यावेळी गौरव इंगोले उपविभागीय अधिकारी माजलगाव संतोष रुईकर तहसीलदार माजलगाव तत्त्वशील कांबळे अधिकार मित्र जिल्हा विधिसेवा प्राधिकरण बीड, बालक कोळी पोलीस निरीक्षक माजलगाव ग्रामीण पोलीस स्टेशन कामगार कामगार विभागाचे अजय लव्हाळे व इतर कर्मचारी उपस्थित होते. सर्व कामगारांची जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी भेट घेतली त्यांची समस्या जाणून घेतली व त्यांना शासकीय योजना विषयी माहिती दिली मुलांना शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणण्यासाठी कोणकोणत्या उपाययोजना कराव्या लागतील यासाठीची माहिती दिली. तसेच सर्व कामगार जळगाव जिल्ह्यातील असल्यामुळे तेथील जिल्हाधिकारी यांच्याशी संपर्क साधून मुलांना शिक्षणाची व्यवस्था करण्यात येईल असे त्यांनी सांगितले. तसेच न्या. वाहब सय्यद यांनी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण जळगाव यांच्याशी संपर्क साधून या सर्व कामगारांना कायदेविषयक मोफत मधून मिळवून देण्याचे आश्वासित करण्यात आले.***

## पदवीधर नोंदणीसाठी १० डिसेंबरपर्यंत मुदतवाढ; मतदारांनी नोंदणी करून घ्यावी-ॲड.मनोज संकाये

परळी वैजनाथ (प्रतिनिधी):- पदवीधर मतदारसंघाच्या आगामी निवडणुकीसाठी ६ नोव्हेंबर २०२५ पर्यंत प्राप्त झालेल्या अर्जांच्या आधारे प्रारूप मतदारयादी तयार करण्यात येणार होती. मात्र, पदवीधर मतदारांना अधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी निवडणूक आयोगाने नोंदणीची अंतिम मुदत १० डिसेंबर २०२५ पर्यंत वाढविली आहे.

निवडणूक आयोगाच्या नियमानुसार १० डिसेंबरपर्यंत प्राप्त होणाऱ्या सर्व अर्जांचे परीक्षण करून पात्र मतदारांचा समावेश ३० डिसेंबर २०२५ रोजी जाहीर होणाऱ्या अंतिम मतदारयादीत करण्यात येणार आहे.

मराठवाडा विभागातील रहिवासी असलेल्या पदवीधरांनी, विशेषतः औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) विभाग पदवीधर मतदारसंघातील मतदार नोंदणी राहिली असल्यास, जबाबदार नागरिक म्हणून तात्काळ अर्ज सादर करून आपले नाव मतदारयादीत नक्की समाविष्ट करून घ्यावे, असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते ॲड. मनोज संकाये यांनी केले आहे. पदवीधर मतदारसंघातील मतदानाचा हक्क अबाधित ठेवण्यासाठी आणि लोकशाही प्रक्रियेत प्रभावी सहभाग नोंदवण्यासाठी ही नोंदणी अत्यंत महत्त्वाची असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. ***

# समाज बदलण्याचे सामर्थ्य शिक्षकांमध्येच-प्रभाकर साळेगावकर

## मराठी शाळा आणि मराठी साहित्य टिकले पाहिजे - संमेलनाध्यक्ष अजयकुमार गंडले यांचे आवाहन





परळी वैजनाथ, (बातमीदार):- परळी येथील कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात दिनांक १६ नोव्हेंबर रोजी सातवे मराठवाडा विभागीय शिक्षक साहित्य संमेलन मोठ्या उत्साहात पार पडले. ज्ञानपीठ पुरस्कार विजेते लेखक शिक्षकच होते, त्यामुळे समाज बदलण्याचे सामर्थ्य शिक्षकांमध्ये आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ कवी व विडंबनकार प्रभाकर साळेगावकर यांनी संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी केले.

संमेलनाचे अध्यक्ष प्रसिद्ध विचारवंत व साहित्यिक अजयकुमार गंडले यांनी आपल्या भाषणात, मराठी शाळा आणि मराठी साहित्य टिकले पाहिजे यासाठी शिक्षकांनी आता पुढाकार घेण्याचे कळकळीचे आवाहन केले.

सकाळच्या सत्रात छत्रपती शिवाजी महाराज, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आणि महर्षी वाल्मिकी यांच्या पुतळ्यांना अभिवादन करून संमेलनाची सुरुवात झाली.

मुख्य संयोजक आणि ज्येष्ठ पत्रकार रानबा गायकवाड यांच्या पुढाकाराने आयोजित या सोहळ्यात उद्घाटक साहित्यिक प्रभाकर साळेगावकर, संमेलनाध्यक्ष अजयकुमार गंडले, स्वागताध्यक्ष प्रदीप खाडे (नाथ शिक्षण संस्थेचे सहसचिव), मराठवाडा शिक्षक संघटनेचे नेते पी. एस. घाडगे, गटशिक्षणाधिकारी गणेश गिरी, माजी संमेलनाध्यक्ष ए. तु. कराड, प्रसिद्ध कवी प्राचार्य अरुण पवार, प्रा. डॉ. राजकुमार यल्लावाड, सामाजिक कार्यकर्ते अनंत इंगळे, उत्तम माने, बालसाहित्यिक नागनाथ बडे, ज्येष्ठ साहित्यिक विश्वंभर वराट आणि श्रीमती खान सबिहा अहेमद बिन अबुद चाऊस यांची प्रमुख उपस्थिती होती. उद्घाटक प्रभाकर साळेगावकर यांनी, शिक्षक विद्यार्थ्यांसाठी साहित्यिकच असतो आणि विद्यार्थ्यांच्या मनात शिक्षकाचे स्थान मोठे असते. शिक्षकांनी वर्गात नेहमी पारदर्शी भूमिका घ्यावी, असे मत मांडले.संमेलनाध्यक्ष अजयकुमार गंडले यांनी, माणसातला माणूसपण घडविणारा शिक्षकच असतो. आदर्श शिक्षकांनी विद्यार्थ्यांना लागलेले मोबाईलचे व्यसन दूर करण्यासाठी शाळेत नियमन करण्याची गरज असल्याचे सांगितले. स्वागताध्यक्ष प्रदीप खाडे यांनी हे संमेलन भविष्यात राज्यस्तरीय व्हावे यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे वचन दिले. उद्घाटन समारंभाचे प्रास्ताविक रानबा गायकवाड यांनी केले, तर सूत्रसंचालन सिद्धेश्वर इंगोले, बा. सो. कांबळे, सुनीता कोम्मावार यांनी तर उद्घाटक परिचय व आभार प्रदर्शन प्रा.डॉ. सिद्धार्थ तायडे यांनी केले. संमेलनात विविध साहित्यविषयक सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. राजकुमार कदम (बीड) यांच्या अध्यक्षतेखाली 'नवीन शैक्षणिक धोरण व ग्रामीण शिक्षणाची गळचेपी' या विषयावर परिसंवाद झाला. डॉ. उमाकांत राठोड यांनी नवीन धोरणामुळे सर्वसामान्यांना स्थान नसेल, तर राजकुमार कदम यांनी शिक्षण नाकारण्याच्या धोरणामुळे ग्रामीण शिक्षणाची गळचेपी झाल्याचे मत मांडले. या सत्राचे प्रभावी सूत्रसंचालन प्रा. डॉ. विक्रम धन्वे यांनी तर आभार बा. सो. कांबळे यांनी व्यक्त केले.

प्रसिद्ध कथाकार अंबादास केदार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सत्रात ग्रामीण कथाकार दत्ता वालेकर यांनी 'यशाची गुरुकिल्ली' तर अंबादास केदार यांनी 'सालगडी' या कथा सादर करून रसिकांची मने जिंकली.या सत्राचे सूत्रसंचालन लक्ष्मण वैराळ तर आभार गणेश खाडे यांनी मांडले. सायंकाळच्या सत्रात प्रा.डॉ.राजकुमार यल्लावाड यांच्या अध्यक्षतेखाली कवी संमेलन झाले. अरुण पवार, बालाजी कांबळे, विश्वंभर वराट, नागनाथ बडे, दत्ता वालेकर, डॉ. सिद्धार्थ तायडे, रमेश मोटे, दिवाकर जोशी, सिद्धेश्वर इंगोले, गंगाधर क्षीरसागर, मोहन राठोड, डॉ.प्रवीण काळे, संदेश वाघमारे, संदेश क्षिरसागर, चंद्रप्रकाश शिंदे, दिपक बिडवे, संजय शिंगणकर यांच्यासह अनेक कवींनी उत्कृष्ट कविता सादर केल्या.

या संमेलनात मराठवाड्यातील विविध शिक्षक-शिक्षिकांचा 'शिक्षक गौरव पुरस्काराने सन्मान करण्यात आला. यात श्री चेनलाड, नवनाथ शिनगारे, मुरलीधर बोराडे, सबीहा खान, बालाप्रसाद चव्हाण, गंगाधर क्षीरसागर, अशोक फड, दत्तात्रय गायकवाड, सय्यद अब्दुल गणी, विनोद देशमुख, महादेव शिंदे, शेख इरफान, वर्षाराणी हाके, संघमित्रा लांडगे, अश्विनी बडे, लता वाघमारे, कल्पना मारमवार, सिमिता सिरसाट आदींचा आदर्श शिक्षक पुरस्कार देवून यावेळी गौरव करण्यात आला.

या संमेलनास मराठवाड्यातील शिक्षक, साहित्यिक आणि परळीकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. स्वागत समितीचे शिवाजीराव बनसोडे, अशोक नावंदे, सौदागर कांदे, दिवाकर जोशी, विलास ताटे,गणेश खाडे, प्राचार्य अतुल दुबे, विकास वाघमारे, विठ्ठलराव झिलमेवाड नवनाथ दाने, विद्याधर शिरसाट यांच्यासह अनेकांनी संमेलन यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. समारोप राष्ट्रगीताने झाला. ***

संपादकीय...

# निवडणुकीची लगीनघाई..!

* सुविचार *

खरं बोलणाऱ्यांना खोटं काय आहे, ते माहिती नसते पण खोटं बोलणाऱ्यांना सत्य काय आहे ते शंभर टक्के माहिती असते.

ऐन हिवाळ्यात कडाक्याच्या थंडीत होत असलेल्या परळीसह बीड जिल्ह्यातील सहा नगरपालिकांच्या निवडणुकीमुळे राजकीय वातावरण तापले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार येत्या ३१ जानेवारीपूर्वी राज्यातील नगरपालिका, नगर पंचायती, पंचायत समित्या, जिल्हा परिषदा व महानगरपालिकेच्या निवडणुका पूर्ण करावयाच्या असल्याने राज्य निवडणूक आयोगासह जिल्हा प्रशासनाची धावपळ होत आहे. सुरूवातील राज्यातील नगर पालिका व नगर पंचायतीच्या निवडणुका होत आहेत. यासाठी निवडणूक प्रक्रिया सुरू झाली असून येत्या दोन डिसेंबरला मतदान होणार आहे. या निवडणुकीसाठी अपुरा वेळ असल्याने स्थानिक कार्यकर्त्यांची मोठी धावपळ सुरू झाली आहे. येत्या सोमवारी या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख असल्याने निवडणुकीसाठी इच्छूक असलेल्या उमेदवारांना अर्ज भरण्यासाठी लागणारी कागदपत्रे काढण्यासाठी मोठी पळापळ होते आहे. अपुरा वेळ व एकूण परिस्थिती पहाता ऑफलाईन व ऑनलाईनही अर्ज भरण्यासाठी तसेच शनिवार, रविवार व या सुट्टीच्या दिवशीही अर्ज भरण्यास राज्य निवडणूक आयोगाने परवानगी दिली असल्याने कार्यकर्त्यांची सोय झाली आहे.


स्थानिक पातळीवर पक्ष संघटनेचे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या दृष्टीने ही निवडणूक महत्वाची असल्याने तसेच आपला पक्ष व संघटना मजबूत करण्यासाठी या निवडणुकीला मोठे महत्व असल्याने नेत्यांच्या दृष्टीनेही हा परीक्षेचा काळ आहे. योग्य उमेदवाराला उमेदवारी देण्याबरोबरच त्यांना निवडून आणणे ही जबाबदारी नेत्यांची असल्याने नेतेही दिवसरात्र एक करत आहेत. बीड जिल्ह्यात बीडसह परळी, अंबाजोगाई, माजलगाव, धारूर व गेवराई या सहा नगर पालिकेच्या निवडणुका होत आहेत. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दुखावलेल्या काही नेते, कार्यकर्त्यांचे इतर पक्षात प्रवेश सुरू झाले आहेत. महायुती व महाआघाडीत अनेक पक्ष एकत्र असल्याने सर्वच पक्षात इच्छुकांची संख्या अधिक आहे. त्यामुळे उमेदवारी कुणाला द्यावी? हा प्रश्न पक्षप्रमुख व नेत्यांपुढे आहे. यामुळे त्यांची डोकेदुखी वाढली आहे. येथे आघाडीत बिघाडी, युतीत नाराजी, धूसफुस पहायला मिळते आहे. नगराध्यक्षपदाची निवडणूक थेट जनतेतून असल्याने या निवडणुकीला मोठे महत्व आले आहे. पक्षाकडून ही उमेदवारी मिळवणसाठी निवडणुका होत असलेल्या ठिकाणी स्थानिक नेते व कार्यकर्त्यांनी प्रतिष्ठा पणाला लागली आहे.

आपल्या परळी शहरात काँग्रेसला उमेदवारी न मिळाल्याने महाविकास आघाडीत बिघाडी होऊन काँग्रेसचे शहराध्यक्ष बहादूरभाई यांनी आपल्या पत्नीची नगराध्यक्षपदासाठी उमेदवारी सर्वांत अगोदर जाहीर करून टाकली आहे. शिवाय आघाडीतील व इतर समविचारी पक्षांना एकत्र येऊन ही निवडणूक लढवण्याचा निर्णयही त्यांनी जाहीर करून टाकला आहे. गेल्या अनेक वर्षापासून परळी पालिकेतील भ्रष्ट कारभाराच्या विरोधात व शहरातील स्थानिक प्रश्नावर लढणाऱ्या तसेच परळीत महाविकास आघाडीची ताकद वाढवणाऱ्या श्री बहादूरभाईंना आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने (शरद पवार गट) धोका देऊन विश्वासघात केल्याने सर्वसामान्य नागरिकांत श्री बहादूरभाईंची सहानुभूती वाढली आहे. महाविकास आघाडीचे या निवडणुकीत दोन गट पडल्याने या आघाडीची ताकत कमी होऊन त्याचा महायुतीला फायदा होणार आहे असे सध्या चित्र आहे. इकडे महायुतीतही जागा वाटपाची बोलणी रविवार (ता.१६) पर्यंत चालूच होती. महायुतीतील राष्ट्रवादीच्या वाट्याला नगराध्यक्षपदासह नगरसेवकांच्या अधिक जागा आल्याने नाराजी वाढली आहे. वंचित बहुजन आघाडी, एमआयएम व इतर पक्षही या निवडणुकीत उतरणार आहेत. त्यामुळे परळी पालिकेची ही निवडणूक यंदा वेगळी व चुरशीची असणार आहे. या निवडणुकीची लगीन घाई सध्या शहरात सुरू झाली आहे. ***

# जिलेबी...!

(कथा)

सौ.शिला पत्की, सोलापूर




मी मुख्याध्यापक झाल्यानंतर माझे ऑफिस दहाला सुरू होत असे. मी क्लार्क आणि सेवक यांचे काम दहा पासून सुरू होत असल्यामुळे आमचं लंच टाईम दुपारी दोन वाजता असे, ज्यामुळे मुलींच्या मधल्या सुट्टीत मला त्यांच्याकडे लक्ष देणे सोयीचे जाईल. कारण त्यांची सुट्टी तीन वाजता होत असे. साधारणपणे डबा खाणा-या सगळ्या गटांमध्ये फिरून मुली डबा काय आणतात याचे मी निरीक्षण करत असे. बिस्किट, वेफर्स, चुरमुरे असे देणाऱ्या पालकांना मी पत्र देत असे किंवा बोलावून घेत असे आणि विद्यार्थिनींना पोळी भाजीचा डबा द्या असे आवर्जून सांगत असे. त्यांचे वाढीचे वय आहे तेव्हा त्यांना भरपूर आहार मिळाला पाहिजे. या पद्धतीने मी वेगवेगळ्या गटात हिंडत असताना मग मुली आमचा एक घास घ्या ना बाई, आमचा एक घास घ्या ना, असा आग्रह करीत. त्याप्रमाणे जिच्या डब्यात अगदी साधं काही असायचं तो घास मी घेत असे. सोलापुरात विशेषतः तेल-चटणी पोळी देण्याची पद्धत आहे. गरीब माणसांचे ते जेवण आहे. त्यामुळे बहुदा बऱ्याच वेळा मी तेल - चटणी पोळीवाला घास घेत असे.

हॉलच्या समोर एक मोठा गट बसलेला होता. पाचवी सहावीच्या विद्यार्थ्यांनी होत्या. आणि मी एका मुलीचा एक घास घेतला. तेव्हा मुलीने ओळखले 'बाई तुम्ही तिची चटणी पोळी आहे म्हणून घेतलं ना, पण तिच्याजवळ अजून एक डबा आहे त्यात जिलबी आहे तो मात्र ती काही काढत नाही.

मी म्हणाले 'चल असं कुठे असता कां ?'ती म्हणाली 'बाई तिला विचारा तिच्या मांडीखाली एक डबा आहे. आणि ती मुलगी रडायला लागली.

इतक्यात बेल झाली आणि ऑफिसमध्ये मला फोन आला म्हणून बोलावणे आले. मी ऑफिसात गेले एस.एस.सी. बोर्डाचा फोन होता त्यामुळे मी त्या कामात गर्क होते. मधली सुट्टी झाल्यामुळे मुली वर्गात गेल्या. सगळीकडे शांतता पसरली आणि एक मुलगी माझ्या ऑफिस बाहेर हमसून हमसून रडताना मला तिचा आवाज ऐकू आला. मी कामात बिझी होते. मी दरवाज्या वरील माझे सेवक शिवा यांना हाक दिली. म्हणाले 'शिवा काय चाललंय, कोण रडतंय.' तेव्हा ते म्हणाले. 'बाई एक मुलगी तुम्हाला भेटायचं म्हणते आणि खूप रडत आहे.'

'ठीक आहे पाठवा.' मग तीच ती मुलगी आत आली आणि माझा हात हातात घेऊन म्हणाली 'बाई नाही हो मी तुम्हाला मुद्दाम जिलेबी दिली नाही असं नाही. मला खरंच वाटायला लागलं. मी म्हणलं 'काही हरकत नाही. तुला ती जिलबी खायची होती कां ?' मी अगदी सहज म्हणाले आणि 'अगं जे असेल डब्यात ना ते सगळ्यांनी वाटून खावं बाळा.' त्यावर तिने जे उत्तर दिलं ते असं होतं. ती म्हणाली 'बाई माझी आई एके ठिकाणी घर कामाला जाते. त्यांच्या घरी आज काही कार्य होते. त्यांनी माझ्या आईला वाढून दिलेले जे ताट होते ते आई घरी घेऊन आली आणि तो दुसरा डबा तिने मला दीड वाजता आणून दिला त्यामध्ये जिलबी होती. पण त्याला भात लागलेला होता. त्यामुळे ते खरकट्या सारखं वाटत होतं. मला वाटलं न जाणं कोणाच्या पानातील असेल तर म्हणून मी ती जिलबी कोणालाच दिली नाही.' आणि ती माझ्या कमरेला मिठी मारून अजूनच रडायला लागली. हे ऐकून माझे डोळे भरून आले. इतकेच काय आमचे सेवक शिवाजी कांबळे सुद्धा रडायला लागले. त्यांनी पटकन दार बंद करून पडदा सारखा केला. मी खुर्चीवरून उठले. त्या मुलीला जवळ घेतलं आणि म्हणाले 'बाळा या परिस्थितीतून बाहेर पडण्याचा सर्वात उत्तम मार्ग म्हणजे शिक्षण होय. तू खूप शिक आणि तुझ्या आईला सुखी कर. तुला शिक्षणाला जी कुठली मदत लागेल ती सेवा सदन शाळा, व्यक्तिशः मी कधीही करायला तयार आहोत. पण मन लावून अभ्यास कर आणि काही तरी बनण्याची जिद्द ठेव.' नंतर तिची समजत घालून मी तिला पाठवून दिले.

मला जाणवले की तिला लक्षात येत होते कुणीतरी वाढून दिलेलं ताटातलं अन्न आपण खातो आहोत. एवढ्या कोवळ्या जीवाला हे कळणं फार वाईट होतं. पण परिस्थिती पुढे इलाज नव्हता. ही गोष्ट माझ्या मनात कुठेतरी खोल रुतून बसली. त्यानंतर सोलापूर आकाशवाणी वरती 'गाणी मनातली' या सदरामध्ये अनेक स्त्रियांच्या मुलाखती झाल्या. त्यामध्ये एखादं गाणं लावायचं आणि ते आपल्याला का आवडले त्याच्या मागची घटना, प्रसंग हे सांगणे... असा तो कार्यक्रम होता. त्याचे प्रसारण रात्री दहा वाजता होत असे त्या कार्यक्रमां मध्ये पाच एक गाणी मी लावली आणि ती गाणी मला कां आवडली असे प्रसंग सांगितले. त्यामध्ये मी हा प्रसंग सांगितला आणि त्यानंतर 'नन्हें मुन्ने बच्चे तेरे मुठ्ठी में क्या है...' हे गाणं लावण्याची मी विनंती केली. त्या घटनेचा प्रभाव लोकांवर एवढा पडला की रात्री साडे अकरापर्यंत मला लोकांचे फोन येत होते- 'किती मनाची पकड घेणारा प्रसंग आहे, आम्ही रडलो...' असं लोक सांगत होते. कार्यक्रम खूपच छान झाला होता. त्यामध्ये साहित्यिक संपादक मा अरविंद जोशी सरांचा फोन आला. ते मला म्हणाले 'तुम्ही शिक्षक असल्याचा मला आज हेवा वाटला.' आणि हे वाक्य माझ्यासाठी त्या कार्यक्रमाचे पावती ठरलं. त्यानंतर या प्रसंगावरती एखादी शॉर्ट फिल्म करावी असे माझ्या डोक्यात होते.

सुमारे चौदा-पंधरा वर्षानंतर मी माझ्या एका शिक्षक मित्राला ही गोष्ट ऐकवली. त्यांनी त्याची पटकथा लिहून आणली. शिक्षणाचे महत्व पटवून देणारा एक प्रसंग त्याला जोडला आणि 'जिलबी' नावाचा लघु चित्रपट तयार झाला. त्यामध्ये डॉक्टर माननीय निशिगंधा ताई वाड यांनी मुख्याध्यापकाची भूमिका केली. विद्यार्थिनींच्या भूमिका इतर काही मुलींनी केल्या होत्या. निशिगंधाताईंनी जेव्हा या चित्रपटाची पटकथा ऐकली तेव्हा त्यांचे ही डोळे भरून आले आणि तात्काळ त्यांनी या लघुपटात काम करण्यासाठी संमती

(उर्वरित पान ३ वर)

'परळी परिसर' हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशू प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतील असे नाही.)
RNI No.-MAHMAR/2017/74640 Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25 (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) www.parliparisar.com
* वर्ष ०९ * अंक २८ * पृष्ठ संख्या- ४ परळी वैजनाथ, जि.बीड (महाराष्ट्र) सोमवार, दि. १७ नोव्हेंबर २०२५ * किंमत : २ रू.

# परळी नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीचा जिल्हाधिकारी यांनी घेतला आढावा

परळी वैजनाथ (बातमीदार):- परळी नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीचा बीडचे जिल्हाधिकारी यांनी शुक्रवारी (दि.१४) भेट देत संपूर्ण निवडणूक पुर्व तयारी कामकाज प्रक्रियाचा आढावा घेतला व सर्वांना आवश्यक सूचना दिल्या व निवडणूक संदर्भातील आदर्श आचारसंहितेचे पालन करावे असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे.



परळी वैजनाथ नगरपरिषद निवडणुकीसाठी राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्यानंतर त्यासाठी नगर परिषदच्या क्षेत्रात आचारसंहिता लागू झाली आहे. नगर पालिकेसाठी १७ प्रभागात ३५ नगरसेवक निवडले जाणार आहेत. नगर परिषद क्षेत्रातील ७९,५६९ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत, त्यात ४१,०२३ पुरुष, ३८,५४३ महिला आणि ३ इतर मतदार आहेत. मतदानासाठी ८८ केंद्रे निश्चित केली आहेत. अर्ज दाखल दि. १० नोव्हेंबर पासून सुरुवात व अंतिम तारीख १७ नोव्हेंबर, छाननी १८ नोव्हेंबर, अर्ज मागे घेण्याची मुदत १९ ते २१ नोव्हेंबर, चिन्ह वाटप २६ नोव्हेंबर, मतदान २ डिसेंबर, आणि मतमोजणी ३ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता होईल. नगर परिषद निवडणुकीसाठी ऑनलाईन अर्ज भरणे सुरू झाले असून, त्या भरलेल्या अर्जाची एक प्रत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे द्यायची आहे. २ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. या लोकशाहीच्या उत्सवात सर्वांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे. परळी वैजनाथ नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक क्षेत्रातील संपूर्ण मतदारांनी मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी अरविंद लाटकर यांनी केले.

जिल्हाधिकारी यांनी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या पूर्व तयारी, स्ट्रॉंग रूम पाहणी, मतमोजणी स्थळ पाहणी आणि मतदान केंद्र पाहणी इत्यादी निवडणूक विषयक बाबींचा आढावा घेतला. तसेच नगर परिषदेच्या हद्दीत आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन करावे, निवडणुकीची आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, या दृष्टीने आदर्श आचारसंहितेची काटेकोरपणे करण्यात यावी,अशा सुचना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिल्या आहेत. तसेच नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक क्षेत्रातील संपूर्ण मतदारांनी मतदानाचा हक्क बजवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले. तसेच परळी नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीसाठी संदर्भातील कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले आहेत. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी अरविंद लाटकर, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी त्र्यंबक कांबळे,सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तहसीलदार व्यंकटेश मुंडे, नायब तहसीलदार परवीन पठाण, नायब तहसीलदार पंडित सुरवसे, नगर परिषद उपमुख्याधिकारी संतोष रोडे यांच्यासह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.**

# निवृत्ती वेतनधारक व कुटूबंनिवृत्ती धारकांनी ३० नोव्हेंबरपर्यत हयात प्रमाणपत्र सादर करावे

बीड (जिमाका):- बीड जिल्हा कोषागार अंतर्गत निवृत्ती वेतन घेणारे निवृत्ती वेतन धारक व कुटुंबनिवृत्तीवेतन धारक यांनी ३० नोव्हेंबरपर्यंत हयात असल्याबाबत दाखला सादर करण्याचे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी यांनी केले आहे.

हयात असल्याबाबतचा दाखला नोंदविण्यासाठी बँकेत हयात दाखला यादी पाठविण्यात आलेली आहे. राज्य शासकीय निवृत्ती वेतनधारक व कुटुंब निवृत्ती वेतन धारक यांनी न चुकता बँकेत जाऊन सदर यादीमध्ये आपल्या नावापुढे स्वाक्षरी करुन किंवा अंगठयाचा ठसा उमटवून हयातीचा दाखला सादर करावा.*

# ॲथलेटिक्स स्पर्धेत वैद्यनाथ कॉलेजच्या विद्यार्थ्यांचे यश



परळी वैजनाथ, (प्रतिनिधी):- बीड येथील बंकटस्वामी महाविद्यालयाच्या मैदानावर दि.१२ नोव्हेंबर रोजी पार पडलेल्या आंतरमहाविद्यालयीन ॲथलेटिक्स स्पर्धेत परळी येथील वैद्यनाथ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन संपादन केले आहे.

यामध्ये १०० मी.धावणे प्रथम पवार ओम,१५०० मी.धावणे प्रथम डुकरे ओम ४ ४०० रीले मी. धावणे प्रथम शुभम चव्हाण,पवार ओम,गुट्टे गोपाल,डुकरे वैभव,२०० मी.धावणे द्वितीय श्रुती बीडगर,८०० मी, धावणे तृतीय बदने माणिक,१०० मी.धावणे तृतीय चहाण धनशी, ४०० मी.धावणे तृतीय गवळी दिव्या या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे.सर्व खेळांडूचे अभिनंदन प्राचार्य डॉ.जे.व्ही.जगजकर उपप्राचार्य,संस्थेचे पदाधिकारी,क्रिडाविभाग प्रमुख डॉ.पी.एल.कराड,शारीरिक शिक्षण विभागप्रमुख डॉ.व्ही.व्ही, बेंडसुरे प्रा.विजय मुंडे यांनी अभिनंदन केले. या विद्यार्थ्यांना साई अकॅडमीचे रमेश चव्हाण यांनी प्रशिक्षण दिले. ***

# ट्रॅव्हल्स गाड्यांमुळे वाहतूक कोंडीचा अड्डा बनले बसस्थानक परिसर-ॲड.मनोज संकाये

परळी वैजनाथ, (बातमीदार):- परळी शहरातील बसस्थानकासमोरील मुख्य रस्त्यावर रात्रीच्या वेळी ट्रॅव्हल्स गाड्या उभ्या राहत असल्याने वाहतूक कोंडीचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. यामुळे एसटी बस, रुग्णवाहिका आणि खासगी वाहनांची मोठी रांग लागते, तसेच नागरिकांना ये-जा करण्यासाठी प्रचंड अडचणींचा सामना करावा लागतो.

या गंभीर परिस्थितीबाबत सामाजिक कार्यकर्ते ॲड.मनोज संकाये यांनी परळी पोलिस प्रशासनाचे लक्ष वेधून तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे. दररोज रात्री बसस्थानकासमोर अनेक ट्रॅव्हल्स गाड्या उभ्या राहतात. प्रवाशांची गर्दी, अनियमित पार्किंग आणि वाहतुकीचा विस्कळीत प्रवाह यामुळे संपूर्ण परिसर अराजकतेच्या वातावरणात सापडतो. बस आगारातून सुटणाऱ्या एसटी बसलाही या गर्दीतून मार्ग काढणे कठीण होते. हा रस्ता परळी शहराचा मुख्य वाहतूक मार्ग असून, इथून रुग्णवाहिका व शालेय वाहनेही जातात. अशा ठिकाणी ट्रॅव्हल्स उभ्या राहणे म्हणजे नागरिकांच्या जीवाशी खेळ आहे, असे मत ॲड. मनोज संकाये यांनी व्यक्त केले. त्यांनी पुढे सांगितले की, वाहतूक पोलिसांनी दररोज या ठिकाणी गस्त घालावी, चुकीचे पार्किंग करणाऱ्या ट्रॅव्हल्सवर दंडात्मक कारवाई करावी. अन्यथा अपघात होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. सदर ठिकाणी वाहतूक कोंडीमुळे प्रवाशांचा त्रास वाढला असून, नागरिक वर्ग आणि व्यावसायिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. स्थानिक सामाजिक संघटनांनी देखील प्रशासनाला इशारा देत सांगितले की, जर तातडीने कारवाई झाली नाही, तर आम्हाला आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल असेही ते म्हणाले. परळीकरांची अपेक्षा आहे की, परळी पोलिस प्रशासनाने तातडीने पावले उचलून बसस्थानक परिसरातून ट्रॅव्हल्स गाड्यांचे अतिक्रमण दूर करावे, वाहतूक सुरळीत करावी आणि नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य द्यावे. ***






# नियमानुसार गाळपापूर्वी दर जाहीर करा- कृती समिती

परळी वैजनाथ, (बातमीदार):- ऊस गाळप हंगाम सुरू झाला असून अनेक साखर कारखाने ऊस गाळपाकरिता घेऊन जात आहेत मात्र जिल्ह्यातील एक ही साखर कारखान्याने ऊस दर जाहीर करणे बंधनकारक असताना देखील दर जाहीर न केल्याने ऊस उत्पादक शेतकरी कृती समितीच्या शिष्टमंडळाने ओंकार शुगर, २०-२० शुगर या साखर कारखान्याच्या कार्यकारी संचालक यांची भेट घेत ऊस दर जाहीर करण्याची लेखी निवेदनाद्वारे मागणी केली.

यंदाच्या खरीप हंगामात झालेली अतिवृष्टी, खतांच्या किमतीत होणारी वाढ, वाढते मजुरीचे दर, ऊस पिकावर होणारा विविध रोगांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी होणारा खर्च, यामुळे ऊस उत्पादनासाठी खर्चात वाढ झाली असून ऊस उत्पादक शेतकरी अडचणीत सापडला आहे. या अडचणीतून बाहेर काढण्यासाठी उसाला एफ.आर.पी. दर ४००० रु. देण्यात यावा, नियमानुसार ऊस गाळप सुरू करण्यापूर्वीच कारखान्यांनी ऊस दर जाहीर करावा जेणेकरून ऊस कोणत्या कारखान्यास द्यायचा हे ठरवण्यास शेतकऱ्यांना सोपे होईल.एक रकमी एफआरपीदर शेतकऱ्यांना ऊस गेल्यानंतर पंधरा दिवसाच्या आत वितरित करावेत. ऊस कारखान्यांकडून होणारी उसाच्या वजनाची व रिकव्हरीची चोरी रोखावी, शेतकऱ्यांच्या ऊस बिलातून कोणतेही प्रकारची कपात करण्यात येऊ नये. कारखान्याच्या कार्यक्षेत्रात ऊस उपलब्ध असताना अवाजवी पणे लांबून वाहतूक करून ऊस गळपास आणू नये व विनाकारण वाहतूक खर्च वाढवू नये या मागण्याकरिता ऊस उत्पादक शेतकरी कृती समितीचे कॉ.एड.अजय बुरांडे, कॉ.मुरलीधर नागरगोजे, दत्ता गव्हाणे, बळीराम मुंडे, ईश्वर सोनवणे, कॉ.भगवान बडे, सुमंत उंबरे आदी शिष्टमंडळाने साखर कारखानदाराकडे केली आहे. **

(पान १ वरुन)........... **जिलेबी**

दिली होती. या लघुपटाचे काम पूर्ण झाले. त्यानंतर हा लघुपट अनेक फिल्म फेस्टिवल मध्ये दाखल झाला. त्यात त्याला सहभाग मिळाला आणि त्याला बरीच पारितोषिके मिळाली.

त्यातल्या कथेला पारितोषक मिळालं मुख्याध्यापकाची भूमिका करण्याला निशिगंधाताईंना पारितोषिक मिळालं. विद्यार्थिनीची भूमिका करणाऱ्या मुलीला पारितोषक मिळालं. दिग्दर्शकाला पारितोषिक मिळालं आणि फिल्मला पारितोषिक मिळालं. किमान पाच-सहा ठिकाणी या फिल्मला पारितोषिके प्राप्त झाली. याशिवाय बर्लिन येथील फिल्म फेस्टिवल मध्ये या लघुपटाची निवड झाली. मेलबर्न ला या फिल्मचे स्क्रीनिंग झाले. मुलांच्या भावविश्वातली वेगळी फिल्म म्हणून त्याला त्या ठिकाणी दाखवण्यात आले आणि सगळीकडेच या लघुपटला खूप गौरवण्यात आले. वृत्तपत्रांनी याच्यावरती भरभरून लिहिले. अशा पद्धतीने एका छोट्या प्रसंगाचा हा एवढा मोठा चित्रपट उभा राहिला.

प्रसंग खूप घडत असतात. टिपणारा माणूस हवा. इतके खरे सेवा सदन शाळेच्या प्रांगणात घडणाऱ्या अशा अनेक घटनांनी वक्ता म्हणून माझी अनुभव समृद्धी वाढवली यात शंका नाही. **